## थोडक्यात...

## शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या बैलाचा केला वाढदिवस साजरा



**(बाळासाहेब मस्के/दै.धर्मयोध्दा)**

**चारठाणा** - जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील शेतकरी विकास परमेश्वर चौवशेटे यांनी आपल्या देवा नावाच्या बैलाचा १ ला वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी बैलासाठी केक कापण्यात आला.हा सोहळा एखाद्या कौटुंबिक कार्यक्रमासारखा होता, ज्या गावात डीजेच्या तालावर मिरवणूक काढण्यात आली. आणि उपस्थित पाहुण्यांना फराळ वाट करण्यात आला.या वेळ सचिन राठोड, रवि चौवशेटे,सोहेल पठाण,ओम रासवे, रितेश रासवे, ज्ञानेश्वर करसकर,बाळु दुबळकर उपस्थित होते

## सेलू नगर परिषदेकडून उत्कृष्ट देखाव्यांना पारितोषिकांची घोषणा

**परभणी-** सेलू नगर परिषद व पोलिस प्रशासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सेलू शहरात काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीतील उत्कृष्ट देखाव्यांना पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. मंगळवार १४ एप्रिल रोजी होणाऱ्या मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या उत्कृष्ट देखाव्यांना प्रथम पारितोषिक ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह व पोलिस प्रशासनाचे प्रशस्तीपत्र, द्वितीय पारितोषिक ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, तसेच तृतीय पारितोषिक ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. सेलू शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुकीत विविध मंडळांकडून सादर करण्यात येणाऱ्या देखाव्यांचे परीक्षण समितीमार्फत मूल्यांकन करून विजेत्यांची निवड करण्यात येणार आहे, अशी माहिती नगराध्यक्ष मिलिंद सावंत, पोलिस उपअधीक्षक दीपक वाघमारे, पोलिस निरीक्षक दीपक बारसे यांनी दिली असून, मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आकर्षक व वैचारिक देखावे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हा सामान्य रुग्णालयात रक्तदान शिबिर संपन्न

**परभणी-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत १४ एप्रिलपर्यंत सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्याअंतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या वतीने जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी येथे आज रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त राजु एडके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सारिका बडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदकुमार सारंग, विशेष समाज कल्याण अधिकारी अनिल अंजनीकर, कार्यालय अधीक्षक बी. एन. स्वामी यांची उपस्थिती होती. शिबिरात अविनाश कंडेरे, अरविंद शिवाजी कोसे, धम्मपाल अशोक बनसोडे, वैभव प्रभाकर साळवे आदी कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते.

# आयपीएस मीना यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीएनएस मध्ये हिंगोली पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

## नांदेड परिक्षेत्रात दुसऱ्यांदा पहिला क्रमांक तर महाराष्ट्रात ‘टॉप-२’ मध्ये मानाचा दर्जा



**(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)**

**हिंगोली** - जिल्हा पोलिसांनी सीसीटीएनएस कार्यप्रणालीच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात आपली छाप पाडली आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये हिंगोली जिल्ह्याने ९९.५० टक्के यशाचा टप्पा गाठत नांदेड परिक्षेत्रात दुसऱ्यांदा पहिले स्थान, तर राज्यात ५३ घटकांमध्ये ‘टॉप-२’ स्थान पटकावले आहे. नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी हिंगोली पोलिसांचे अभिनंदन केले आहे.

सीसीटीएनएस कार्यप्रणाली ही महाराष्ट्रात सप्टेंबर २०१५ पासुन चालु झालेली असुन त्यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील सर्व पोलिस स्टेशन चे सर्व कामकाज ऑनलाईन चालते. त्यामध्ये तक्रारदार यांची तक्रार घेवुन ती ऑनलाईन करुन गुन्हा दाखल केल्या जातो व त्या गुन्ह्याचा सर्व तपास हा वेळे मध्ये सीसीटीएनएस प्रणाली मध्ये भरण्यात येतो. तसेच या प्रणाली द्वारे आरोपींचा पुर्व इतिहास पडताळुन त्यांचेवर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येतात. हिंगोली जिल्हयामध्ये सीसीटीएनएस नोडल अधिकारी म्हणुन आयपीएस कमलेश मीना, अपर पोलीस अधीक्षक हिंगोली हे कामकाज पाहतात. कमलेश मीना अपर पोलीस अधीक्षक हिंगोली यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन ला सीसीटीएनएस कामकाज करण्यासाठी एक किंवा दोन अंमलदार यांची सीसीटीएनएस पर्यवेक्षक म्हणुन नेमणुक करण्यात आली असुन सदर पर्यवेक्षक अंमलदार यांच्या कामकाजाकडे लक्ष देण्यासाठी सीसीटीएनएस देखरेख अधिकारी म्हणुन नेमणुक केलेली आहे. सदर सीसीटीएनएस देखरेख अधिकारी व सीसीटीएनएस पर्यवेक्षक यांना प्रत्येक महिन्याला सीसीटीएनएस शाखा, हिंगोली येथे कार्यरत असलेले पोलीस हेडकॉन्स्टेबल राजु पांडुरंग हमाने, पोलीस अंमलदार राहुल परमेश्वर तडकसे, महिला पोलीस अंमलदार पुजा सखाराम जाधव यांचे मार्फत सीसीटीएनएस कार्यप्रणाली तसेच सदर प्रणालीशी निगडित असलेले सर्व प्रकारचे पोर्टल जसे सीसीटीएनएस, आयसीजेएस. आयटीएसएसओ, क्रायमॅक व इतर प्रकारचे पोर्टलबाबत सविस्तर मार्गदर्शन करुन प्रशिक्षण दिल्या जाते तसेच प्रणालीशी निगडित असलेल्या सर्व प्रकारच्या अडी अडचणी तात्काळ सोडवल्या जातात व सर्व पर्यवेक्षक यांना वेळोवेळी कामकाज करुन घेण्याकरिता पाठपुरावा करण्यात येतो. त्यामुळे जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनचे कामकाज सुरळीत चालते.

प्रत्येक महिण्याला गुन्हे अन्वेशन विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे हे महाराष्ट्र राज्यातील ५३ घटकांच्या कामगिरी बाबतचा आढावा घेवुन दर महिण्याला प्रत्येक घटकाला गुणांकण देते. जानेवारी २०२६ महिण्यात हिंगोली घटकाला कामगिरीमध्ये २०१ पैकी २०० गुण मिळाल्याने हिंगोली जिल्हयाची ९९.५०% कामगिरी असल्याने हिंगोली जिल्हा नांदेड परिक्षेत्रामध्ये पहीला तर महाराष्ट्रामध्ये टॉप-०२ द्वितीय क्रमांक मिळाला आहे.

डॉ.नीलाभ रोहन पोलीस अधीक्षक, हिंगोली व कमलेश मीना अपर पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली सीसीटीएनएस शाखा, हिंगोली येथे जिल्हयाचे सीसीटीएनएस स्पोक म्हणुन कार्यरत असलेले पोलीस हेडकॉन्स्टेबल राजु पांडुरंग हमाने, पोलीस अंमलदार राहुल परमेश्वर तडकसे, महिला पोलीस अंमलदार पुजा सखाराम जाधव तसेच जिल्ह्यातील सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी, सीसीटीएनएस देखरेख अधिकारी, सीसीटीएनएस पर्यवेक्षक/अंमलदार या सर्वांनी वेळेत सीसीटीएनएस कामकाज केल्याने माहे जानेवारी २०२६ मध्ये महाराष्ट्रात हिंगोली जिल्हा नांदेड परिक्षेत्रामध्ये पहीला तर महाराष्ट्रामध्ये द्वितीय (टॉप-०२) मध्ये आलेला आहे. सीसीटीएनएस कार्यप्रणाली मध्ये हिंगोली जिल्ह्याची कामगिरी ही उल्लेखनिय आहे.

### “गुन्हे तपास अधिक पारदर्शक झाला” कमलेश मीना



अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी सांगितले की, “सीसीटीएनएस प्रणालीमुळे गुन्हे तपास अधिक वेगवान, कार्यक्षम आणि पारदर्शक झाला आहे. सर्व पोलिस ठाण्यांनी या प्रणालीचा जबाबदारीने वापर केला असल्यानेच हिंगोली जिल्ह्याने राज्यात अग्रस्थान मिळवले आहे.” तर नांदेड परिक्षत्रात हिंगोली जिल्ह्याने दुसऱ्यांदा प्रथम क्रमांक मिळविला आहे. ही हिंगोली पोलिस दलासाठी अभिमानाची गोष्ट आहे. सिसिटिएनएस नोडल अधिकारी म्हणून काम करत असतांना जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रात प्रथमस्थानी नेण्यासाठी पुढेही प्रयत्न सुरू राहतील असे मत मीना यांनी व्यक्त केले आहे.

## १० एप्रिल रोजी जन्मलेल्या मुलीचे स्वागत करुन ना. मेघना बोर्डीकर यांचा वाढदिवस साजरा




**परभणी** - राज्याच्या राज्यमंत्री तथा जिल्हाच्या पालकमंत्री ना. मेघना दिदी बोर्डिकर १० एप्रिल रोजी वाढदिवस होता त्या निमित्त निमित्त महिला जिल्हा रुग्णालयात मेघना बोर्डीकर यांच्या वाढदिवसाच्या दिवशी जन्मलेल्या मुलींचे स्वागत चांदीचे चैन,ड्रेस व आई वडिलांना साडी रुमालटोपी देत सन्मान करण्यात आला.. या वेळी पालमंत्री मेघना बोर्डीकर यांनी विडिओ कॉल च्या माध्यमातून रूग्णालयाती मातांशी संवाद साधला.

लेक वाचवा लेक शिकवा हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला या उपक्रमाचे आयोजन हनुमान घुंबरे वाघाळकर व सय्यद जाफर वाघाळकर यांनी केले केले.. या वेळी उपस्थित अजर पटेल, सय्यद पाशाभाई, अमोल रायमाले डॉ.वर्मा मानवतकर सह जिल्हा महिला रूग्णालयाचा सर्व स्टाप उपस्थित होता.

# सुशिक्षित बेरोजगारांसाठी १५ एप्रिल रोजी रोजगार मेळावा

**परभणी-** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास व बाल संस्कार केंद्र, शिवाजीनगर (दिंडोरी प्रणित), शाखा क्र. १, वसमत रोड, परभणी येथे “पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा” आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागामार्फत आयोजित या मेळाव्यात विविध नामांकित उद्योग व खाजगी आस्थापनांचा सहभाग राहणार असून, दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर आदी पात्रताधारक उमेदवारांसाठी विविध पदांवर भरती केली जाणार आहे. बँक ऑफिसर, बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर, क्षेत्र अधिकारी, नर्सिंग, वॉर्डबॉय, रिसेप्शनिस्ट, सेल्स प्रतिनिधी, कृषी अधिकारी, ट्युनिंग ऑपरेटर, विमा सल्लागार, विमा सखी, लाईफ मित्र आदी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना प्रारंभी मासिक वेतन १० हजार ते २५ हजार रुपये देण्यात येणार असून, अनुभवाच्या आधारे त्यात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक पात्रतेनुसार दरमहा ६ हजार ते १० हजार रुपये इतके विद्यावेतन ११ महिन्यांसाठी दिले जाणार आहे. रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी ... या संकेतस्थळावर नावनोंदणी करावी. तसेच दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता संबंधित ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहाय्यक आयुक्त प्र.सो. खंदारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्र. ०२४५२-२२००७४ वर संपर्क साधावा.

## जि प उर्दू प्रा शा चारठाणा येथील विद्यार्थी क्रीडा स्पर्धेत जिल्हास्तर व विभागस्तरावर चमकले



**(संतोष तायडे/ दै.धर्मयोध्दा)**

**बोरी-** जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील शैक्षणिक क्षेत्रा बरोबरच क्रीडा क्षेत्रा पण नाव लौकिक असलेले जि प उर्दू प्रा शा चारठाणा येथील विद्यार्थी हे बॉल बॅडमिंटन स्पर्धेत १४ वर्षाखालील मुले व मुली असे दोन्ही संघ जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला तसेंच १४ वर्षाखालील मुलीच्या संघाने *विभागस्तरावर तृतीय क्रमांक पटकावला याच्या या यशामागे मार्गदर्शन क्रीडा शिक्षक *सय्यद अनवर सर शाळेचे मुख्याध्यापक जुबेर सर, अब्दुल हबीब सर, रहेमान सर, कामराण सर, अझर सर, अतिक सर, हुमेरा मॅडम, आबेदा मॅडम, शहेनाज मॅडम, या सर्वांनी प्रयत्न केले त्याच्या या यशाबद्दल विस्तार अधिकारी राठोड सर, केंद्रप्रमुख साबळे सर, सर्व सन्माननीय शाळा व्यवस्थापन समिती तथा सर्व पालक वर्गाकडून कौतुक करण्यात आले तसेंच पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आले

## कवी. प्रभाकर केदारलिंग जाधव इडोळीकर यांना राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कार जाहीर




**(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)**

**हिंगोली-** तथा कादंबरीकार श्री प्रभाकर केदारलिंग जाधव ईडोळीकर यांच्या स्वलिखित “हुंदका “ कादंबरीला राज्यस्तरीय सावित्रीबाई फ ुले साहित्य भूषण पुरस्कार जाहीर झाल्याचं, दिनांक १३ एप्रिल २०२६ सोमवार रोजी मराठी साहित्य मंडळ ठाणे यांचे निवड पत्र प्रभाकर जाधव यांना प्राप्त झाले आहे.

मराठी साहित्य मंडळ ठाणे या प्रख्यात संस्थेतर्फे पुरस्कारासाठी राज्यभरातून प्रस्ताव मागवले होते. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून संपूर्ण राज्यभरातून भरपूर प्रस्ताव प्राप्त झाले होते. या प्रस्तावामधून आमच्या तज्ञ निवड समितीने आपल्या “हुंदका“ या कादंबरीची निवड,सावित्रीबाई फ ुले साहित्यभूषण पुरस्कारासाठी निवड केली आहे. आपले साहित्यिक क्षेत्रातील योगदान लक्षात घेता आपणास यावर्षीचा मानाचा व अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले साहित्यभूषण पुरस्कार लाभला आहे त्याबद्दल पुनश्च आपले एकदा हार्दिक अभिनंदन !

हा पुरस्कार कवी प्रभाकर केदारलिंग जाधव यांना मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सन्मानाने प्रदान करण्यात येणार असल्याचे निवड पत्रात म्हटले आहे. तरी आपण दिनांक ०१ मे २०२६ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता श्रीनिवास मंगल कार्यालय छत्रपती शिवाजी महाराज चौक लोहा जि.नांदेड येथे संमेलन स्थळी उपस्थित राहण्याविषयी कळविले आहे.

मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर ( ज्येष्ठ साहित्यिक तथा राष्ट्रीय अध्यक्ष), ललिता गवांदे (ज्येष्ठ कवयत्री तथा उपाध्यक्ष मराठी साहित्य मंडळ), नीलिमा जोशी (ज्येष्ठ लेखिका तथा राष्ट्रीय सरचिटणीस मराठी साहित्य मंडळ), विश्वस्त रेखा दीक्षित कोल्हापूर, श्रीमती वर्षा थोरात (महाराष्ट्र प्रदेश सचिव, मराठी साहित्य मंडळ ठाणे) निवडपत्र हे उपरोक्त मान्यवरांच्या स्वाक्षरीने पारित केले आहे.

या पुरस्कारामुळे कवी प्रभाकर केदारलिंग जाधव ईडोळीकर यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## डी.जे.पी.एस. फार्मसी महाविद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्साहात साजरी



**(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)**

**मानवत**- पाथरी (प्रतिनिधी) पाथरी येथील डी.जे.पी.एस. फार्मसी महाविद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे समन्वयक श्री. रमेश पाटील, प्राचार्य डॉ. रमेश इंगोले,विभाग प्रमुख प्रा.पिंपळे सर,जी.प्रा.मिलिंद सुर्यवंशी , तसेच सर्व शिक्षक ,शिक्षिकेतर कर्मचारी ऊपस्थीत होते .यावेळी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले . उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा स्मरण करून समाजसेवेची प्रेरणा घेतली. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. रमेश इंगोले यांनी महात्मा फुले यांच्या महान कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, महात्मा फुले हे भारतीय समाजसुधारणेचे अग्रदूत होते. त्यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि समाजातील अस्पृश्यता, जातीय भेदभाव व अज्ञानाविरुद्ध कठोर लढा दिला. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कार्यातून दिला. डॉ. इंगोले पुढे म्हणाले की, महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांती घडवली. त्यांनी शेतकरी, दलित व वंचित घटकांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. त्यांच्या विचारांचा आदर्श आजही समाजाला दिशा देणारा आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी महात्मा फुले यांच्या विचारांनुसार समाजसेवा व समतेसाठी कार्य करण्याचा संकल्प केला.

## महावितरणच्या निष्काळजीपणामुळे वीजपुरवठा खंडित; सखोल चौकशीची मागणी




**(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)**

**मानवत** - दिनांक ११ एप्रिल रोजी झालेल्या एका स्फोटामुळे वीजवाहिन्या तुटून परिसरातील वीजपुरवठा खंडित झाल्याची घटना घडली आहे. ही घटना महावितरणच्या निष्काळजी पणामुळेच घडल्याचा आरोप स्थानिक खाण मालक शिवाजी विठ्ठलराव दहे यांनी केला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बायपास रोड मानवत येथील रहिवासी शिवाजी दहे यांच्या खदानीसाठी गौण खनिज विभाग मुंबई, जिल्हा खणीकर्म अधिकारी परभणी आणि जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडून सर्व आवश्यक परवानग्या रीतसर प्राप्त आहेत. खदानीचे कामकाज नियमानुसार सुरू असताना ११ एप्रिलला स्फोटाच्या वेळी वीजवाहिन्या तुटल्या. या घटनेला महावितरणचा निष्काळजीपणा जबाबदार असल्याचे दहे यांनी म्हटले आहे. त्यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, त्यांच्याकडून कोणताही नियमभंग झालेला नाही. त्यामुळे या घटनेची सखोल चौकशी करून महावितरणच्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि या प्रकरणी तात्काळ न्याय द्यावा, अशी विनंतीही त्यांनी केली आहे. या घटनेमुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून, आता प्रशासन यावर काय पाऊल उचलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao